L. A. BILL No. XVI OF 2015.

A BILL

FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA.

सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६.

महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०१५, असे म्हणावे.

(२) या अधिनियमात, अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त,—

(क) कलमे २ ते ५, कलम ६ चे पोट-कलम (१) आणि कलमे ७ ते ११, दिनांक १ एप्रिल २०१५ पासून अंमलात येतील ;

(ख) कलम ६ चे पोट-कलम (२) दिनांक १ मे २०१५ पासून अंमलात येईल.

प्रकरण दोन

महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ याची सुधारणा.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १२ब ची सुधारणा.

२. महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ याच्या कलम १२ब मध्ये, खंड (ई) मधील, "सन २०१३-१४ या वर्षात" या मजकुराऐवजी, "सन २०१३-१४ आणि २०१४-१५ या वर्षात" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६२ चा महा.९.

प्रकरण तीन

महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याची सुधारणा.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

३. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यास जोडलेल्या अनुसूची एक मधील, नोंद १ मध्ये, खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९७५ चा महा. १६.

"(ब) (एक) पुरुष असल्यास, ७,५०० रुपयांहून अधिक मात्र १०,००० रुपयांहून अधिक नसेल ; . . दरमहा १७५

(दोन) महिला असल्यास, १०,००० रुपयांहून अधिक नसेल ; . . काही नाही.".

प्रकरण चार

महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ याची सुधारणा.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याला जोडलेल्या अनुसूचीची सुधारणा.

४. महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ याला जोडलेल्या अनुसूचीमध्ये, नोंद १६ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :— २००३ चा महा. ४.

"१७. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याला जोडलेल्या अनुसूची "ग" च्या नोंद ५५ च्या खंड (चार) व (पाच) मध्ये समाविष्ट केलेला माल. . . ५%.".

प्रकरण पाच

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याची सुधारणा.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २ ची सुधारणा.

५. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "मूल्यवर्धित कर अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये,— २००५ चा महा. ९.

(एक) खंड (२०) मध्ये, स्पष्टीकरण-एक नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :—

१९९४ चा ३२. "**स्पष्टीकरण–एक क.**— वित्त अधिनियम, १९९४ खाली आकारण्यात आलेल्या किंवा आकारणीयोग्य असलेल्या आणि विक्रेत्याने स्वतंत्रपणे वसूल केलेल्या सेवा कराच्या रकमेचा समावेश खरेदी किंमतीत होणार नाही. ";

(२) खंड (२५) मध्ये, स्पष्टीकरण—एक नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :—

१९९४ चा ३२. "**स्पष्टीकरण–एक क.**— वित्त अधिनियम, १९९४ खाली आकारण्यात आलेल्या किंवा आकारणीयोग्य असलेल्या व खरेदीदाराकडून स्वतंत्रपणे वसूल केलेल्या सेवा कराच्या रकमेचा समावेश विक्री किंमतीत होणार नाही. ".

६. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २० मध्ये,— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २० ची सुधारणा.

(१) पोट-कलम (४) च्या परंतुकामधील, " उपरोक्त प्रत्येक खंडाअन्वये " या मजकुराऐवजी, " उपरोक्त प्रत्येकी खंड (क) किंवा, यथास्थिति, खंड (ख) अन्वये, " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (६) मध्ये, " दोन हजार " या मजकुराऐवजी, " एक हजार " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

७. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २३ मध्ये,— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २३ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (५) मध्ये,—

(क) खंड (क) मध्ये " या अधिनियमाअन्वये कोणतीही कार्यवाही करीत असताना, " हा मजकूर वगळण्यात येईल आणि " वजावट अधिक असल्याचा दावा केला असल्याची विहित अधिकाऱ्याची खात्री झाली असेल " या मजकुराऐवजी, " वजावट अधिक असल्याचा दावा केला आहे असे विहित अधिकाऱ्यास सकारण वाटत असेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (घ) मधील, परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, दिनांक १ एप्रिल २०१५ रोजी किंवा त्यानंतर या पोट-कलमान्वये नोटीस काढण्यात आली असेल त्याबाबतीत, व्यवहाराचा किंवा, यथास्थिति, दाव्याचा अंतर्भाव असलेल्या त्या वर्षाच्या समाप्तीपासून सहा वर्षांनंतर या पोट-कलमान्वये कोणताही निर्धारण आदेश काढला जाणार नाही." ;

(२) पोट-कलम (११) मध्ये, " (३) किंवा (४) " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला असेल त्या दोन्ही ठिकाणी या मजकुराऐवजी, " (३), (४) किंवा, यथास्थिति, (५) " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (१२) मध्ये, " (३) किंवा (४) " या मजकुराऐवजी, " (३), (४) किंवा, यथास्थिति, (५) " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

८. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २८ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ मध्ये कलम २८ बदली दाखल करणे.

" २८. कोणत्याही न्यायालयाने, किंवा न्यायाधिकरणाने किंवा कोणत्याही अपील प्राधिकरणाने किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाने,— कर दायित्वातील फेरबदल.

(एक) या अधिनियमाखाली किंवा इतर कोणत्याही अधिनियमाखाली निर्धारित करण्यात आलेला कोणताही कर हा, तो ज्या अधिनियमाखाली निर्धारित करण्यात आला असेल त्याहून अन्य अधिनियमाच्या तरतुदींखाली निर्धारित करावयास हवा होता, किंवा

(दोन) मान्य केलेल्या किंवा अमान्य केलेल्या कोणत्याही दाव्यामुळे या अधिनियमाखाली किंवा इतर कोणत्याही अधिनियमाखाली कर दायित्वात फेरबदल होत आहे,

अशा आशयाचा अपील किंवा पुनर्विलोकन आदेश पारीत केला असेल, त्याबाबतीत अशा आदेशाच्या परिणामी, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या आत कोणत्याही वेळी या अधिनियमाखालील अशा

उलाढालीचे किंवा तिच्या भागाचे निर्धारण करता येईल किंवा, यथास्थिति, अशा दाव्याच्या मान्यतेमुळे किंवा अमान्यतेमुळे येणाऱ्या कर दायित्वाची निश्चिती करता येईल आणि असे निर्धारण व निश्चिती ही कराच्या अधीन असेल :

परंतु, कोणतेही निर्धारण अगोदरच केलेले असेल त्याबाबतीत, मुदत मर्यादेसंबंधातील कोणतीही तरतूद अशा निर्धारणाच्या कालावधीस लागू होत असली तरी सुद्धा, व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर निर्धारणात फेरबदल करण्यात येतील. ".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३० ची सुधारणा.

९. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ३० मधील, पोट-कलम (२) मध्ये, परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, व्यापाऱ्याने, कलम २० च्या पोट-कलम (४) च्या खंड (ख) किंवा, यथास्थिति, खंड (ग) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे सुधारित वार्षिक विवरण दाखल केले असेल त्याबाबतीत, तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून अशा सुधारित वार्षिक विवरणानुसार, कराच्या जादा रकमेवर कराची अशी जादा रक्कम प्रदान करण्याच्या दिनांकापर्यंत व्याज देय असेल.

तक्ता

ज्या वर्षासाठी सुधारित वार्षिक विवरण दाखल केले असेल त्या वर्षातील नोंदणीची स्थिती (१)	पासून गणना करावयाचे व्याज (२)
(क) संपूर्ण वर्षासाठी नोंदणी प्रमाणपत्र धारण करणारा व्यापारी.	सुधारित वार्षिक विवरण ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षातील १ ऑक्टोबर.
(ख) सुधारित वार्षिक विवरण ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या ३० सप्टेंबर पर्यंतच्या कोणत्याही दिनांकापासून दिलेले नोंदणी प्रमाणपत्र.	सुधारित वार्षिक विवरण ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षातील १ ऑक्टोबर.
(ग) सुधारित वार्षिक विवरण ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या ३० सप्टेंबर नंतरच्या कोणत्याही दिनांकास रद्द झालेले नोंदणी प्रमाणपत्र.	सुधारित वार्षिक विवरण ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षातील १ ऑक्टोबर.
(घ) सुधारित वार्षिक विवरण ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या ३० सप्टेंबर नंतर कोणत्याही दिनांकापासून दिलेले नोंदणी प्रमाणपत्र.	नोंदणीचा प्रभावी दिनांक.
(ङ) सुधारित वार्षिक विवरण ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या ३० सप्टेंबर पूर्वी कोणत्याही दिनांकास रद्द झालेले नोंदणी प्रमाणपत्र.	नोंदणी रद्द झाल्याचा प्रभावी दिनांक. ".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

१०. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ४४ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (४क) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, एकत्रीकरण, विलीनीकरण किंवा, यथास्थिति, विलगीकरणाच्या बाबतीत, व्यवसायाचे हस्तांतरण हे, कंपनीने पर्याय स्वीकारल्याप्रमाणे, एकतर,–

(एक) उच्च न्यायालय, न्यायाधिकरण किंवा केंद्र सरकारच्या आदेशाच्या दिनांकापासून, किंवा

(दोन) कंपनी निबंधक ज्या दिनांकास एकत्रीकरण, विलीनीकरण किंवा, यथास्थिति, विलगीकरण अधिसूचित करील त्या दिनांकापासून,

अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल. ".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४७ ची सुधारणा.

११. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ४७ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील,—

(क) " न्यायालयाच्या " या मजकुराऐवजी, " न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " आदेशाच्या दिनांकास संपणाऱ्या " या मजकुराऐवजी, " कंपनीने पर्याय स्वीकारलेल्या आदेशाच्या दिनांकास किंवा ज्या दिनांकास कंपनी निबंधक एकत्रीकरण अधिसूचित करील अशा दिनांकास संपणाऱ्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " उक्त आदेशाच्या तारखेपर्यंतच्या " या मजकुराऐवजी, " कलम ४४ च्या पोट-कलम ४क अन्वये तिने पर्याय स्वीकारलेल्या अशा दिनांकापर्यंतच्या " हा मजकूर आणि " उक्त आदेशाच्या दिनांकापासून " या मजकुराऐवजी, " कलम ४४ च्या पोट-कलम ४क अन्वये तिने पर्याय स्वीकारलेल्या अशा दिनांकापासून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (२क) मध्ये,—

(क) खंड (क) मध्ये,—

(एक) " न्यायालयाच्या " या मजकुराऐवजी, " न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) " त्या आदेशाच्या दिनांकापर्यंत " या मजकुराऐवजी, " कंपनीने पर्याय स्वीकारलेल्या आदेशाचा दिनांक किंवा ज्या दिनांकास कंपनी निबंधक विलगीकरण अधिसूचित करील असा दिनांक असणाऱ्या दिनांकापर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ख) मध्ये,—

(एक) " उक्त आदेशाच्या दिनांकापर्यंत " या मजकुराऐवजी, " कलम ४४ च्या पोट-कलम ४क अन्वये कंपनीने पर्याय स्वीकारलेल्या अशा दिनांकापर्यंतच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " उक्त आदेशाच्या दिनांकापासून " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला असेल त्या दोन्ही ठिकाणी त्या मजकुराऐवजी, " कलम ४४ च्या पोट-कलम ४क अन्वये कंपनीने पर्याय स्वीकारलेल्या अशा दिनांकापासून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या अनुसूची ग यामध्ये सुधारणा.

१२. मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ग मध्ये,—

(१) नोंद ४ मध्ये, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल आणि ते दिनांक १ एप्रिल २००५ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

" **स्पष्टीकरण.**—वेळोवेळी अस्तित्वात असल्याप्रमाणे, या नोंदीच्या प्रयोजनार्थ, " शिलाईचा दोरा " यात भरतकामाचा दोरा याचा अंतर्भाव असेल. " ;

(२) नोंद ९१ मध्ये, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल आणि ते दिनांक १ एप्रिल २००५ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

" **स्पष्टीकरण.**—वेळोवेळी अस्तित्वात असल्याप्रमाणे, या नोंदीच्या प्रयोजनार्थ, " मसाले " यात, सर्व स्वरूपातील मसाले, सर्व प्रकारचे मसाले आणि कोणत्याही मसाल्यांची मिश्रणे यांचा अंतर्भाव असेल. " .

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या अनुसूची ग च्या नोंद ५४ अन्वये काढलेल्या अधिसूचनेमध्ये सुधारणा.

२००५ चा महा. ९.

१३. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याच्या अनुसूची ग च्या नोंद ५४ अन्वये काढलेली शासकीय अधिसूचना, वित्त विभाग, क्र. मूवक. १५०५/प्र. क्र. २३४/कराधान-१, दिनांक १ सप्टेंबर २००५ यामध्ये, उक्त अधिसूचनेला जोडलेल्या अनुसूचीतील, नोंद २ मध्ये, स्तंभ (५) मधील, " देशी लोणी " या मजकुराऐवजी, " देशी लोणी, पांढरे लोणी (व्हाईट बटर) " हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक १ सप्टेंबर २००५ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण सहा

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

१४. (१) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०१५ (यात यापुढे, या कलमात, ज्याचा निर्देश " सुधारणा अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (यात यापुढे, या कलमात, ज्याचा निर्देश " मूल्यवर्धित कर अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या तरतुदींअन्वये कोणत्याही व्यापाऱ्याने वा व्यक्तीने केलेल्या विक्री किंवा खरेदीबाबत केलेले कराचे कोणतेही निर्धारण, पुर्नविलोकन, आकारणी वा वसुली अथवा असे निर्धारण, पुर्नविलोकन, आकारणी वा वसुली यांसंबंधात केलेली कोणतीही कार्यवाही किंवा गोष्ट ही, जणू काही असे निर्धारण, पुर्नविलोकन, आकारणी वा वसुली किंवा कार्यवाही किंवा गोष्ट ही, सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मूल्यवर्धित कर अधिनियम याअन्वये यथोचितरित्या केलेली, हाती घेण्यात आलेली किंवा करण्यात आलेली होती असे समजून वैध आणि प्रभावी असल्याचे समजण्यात येईल, आणि तद्‌नुसार,—

२०१५ चा महा.

२००५ चा महा. ९.

(क) अशा कोणत्याही कराचे निर्धारण, पुर्नविलोकन, आकारणी किंवा वसुली यांच्या संबंधात राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याने केलेली सर्व कृती, कार्यवाही किंवा गोष्टी ह्या, सर्व प्रयोजनांसाठी, नेहमीच कायद्यानुसार केल्याच्या आणि करण्यात आल्याच्या समजण्यात येतील ;

(ख) अशा रीतीने भरण्यात आलेल्या कोणत्याही कराच्या परताव्यासाठी कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही कोणत्याही न्यायालयात किंवा कोणतेही न्यायाधिकरण, अधिकारी किंवा इतर प्राधिकारी यांच्यापुढे दाखल करण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही ; आणि

(ग) कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, अधिकारी किंवा इतर प्राधिकारी, अशा कोणत्याही कराच्या परताव्याचा निर्देश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश अंमलात आणणार नाही.

(२) शंका निरसनासाठी, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे एखाद्या व्यक्तीला,—

(क) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या तरतुदींनुसार पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कराचे कोणतेही निर्धारण, पुर्नविलोकन, आकारणी किंवा वसुली यांच्यासंबंधात हरकत घेण्यास, किंवा

(ख) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मूल्यवर्धित कर अधिनियमान्वये कराच्या रूपाने तिच्याकडून येणे असलेल्या रकमेपेक्षा अधिक असणारी, तिने भरलेल्या कोणत्याही कराची रक्कम परत मिळण्याची मागणी करण्यास,

प्रतिबंध होतो असा अर्थ लावण्यात येणार नाही.

(३) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मूल्यवर्धित कर अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे एखादी व्यक्ती, सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, तिने केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल, जर अशी कृती किंवा वर्जन हे मूल्यवर्धित कर अधिनियमाअन्वये अपराध ठरत नसेल तर, सिद्धपराध ठरवली जाण्यास पात्र असणार नाही, मात्र या सुधारणा अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या सुधारणांच्या बाबतीत ही गोष्ट लागू होणार नाही. तसेच कोणतीही व्यक्ती अशी कृती किंवा वर्जन यांच्या संबंधात सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये तिच्यावर लादण्यात आली असती अशा शास्तीपेक्षा अधिक शास्तीस पात्र ठरणार नाही.

उद्देश व कारणे यांचे निवेदन.

सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख केलेले प्रस्ताव अंमलात आणण्याच्या हेतूने, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६), महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ (२००३ चा महा. ४) आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) यांनुसार कर बसविण्यासाठी आणि त्यांच्या अंमलबजावणीच्या कार्यपद्धतीविषयक बाबींचे सुसूत्रीकरण करण्यासाठी, राज्य शासनास उक्त अधिनियमांमध्ये यथोचित सुधारणा करणे इष्ट वाटते. २०१४-१५ या वर्षाकरिता साखर कारखान्यांमार्फत ऊसाच्या खरेदीवरील कराच्या प्रदानात सूट देण्याबाबत महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ (१९६२ चा महा. ९) यामध्ये देखील सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

२. ज्या सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे त्यांपैकी काही महत्त्वाच्या सुधारणा स्थूलमानाने पुढीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत :—

(एक) शेतकऱ्यांना वाजवी व किफायतशीर मूल्य देण्याकरिता राज्यातील साखर कारखान्यांना सहाय्य करण्यासाठी २०१४-१५ या वर्षाकरिता कर प्रदानातून सूट देण्याबाबत अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यासाठी, महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे ;

(दोन) दरमहा रुपये १०,००० पर्यंत वेतन घेणाऱ्या महिलांना व्यवसाय कराच्या प्रदानातून सूट देण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे ;

(तीन) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याच्या अनुसूची ग च्या नोंद ५५ च्या खंड (चार) व (पाच) यांमध्ये समाविष्ट असलेल्या मालावर कर बसविण्यासाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे ;

(चार) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यामध्ये पुढील सुधारणा करण्यात येत आहेत,—

(क) " खरेदी किंमत " व " विक्री किंमत " यांच्या व्याख्येतून सेवा कराचे घटक वगळणे ;

(ख) कलम २० च्या पोट-कलम (४) च्या खंड (घ) अन्वये एकापेक्षा अधिक वेळा सुधारित विवरण भरण्याची मुभा देणे ;

(ग) कलम २३ च्या पोट-कलम (५) अन्वये व्यवहारनिहाय निर्धारणासाठी सहा वर्षांच्या कालमर्यादेची तरतूद करणे आणि कर चुकविण्यात आला आहे इत्यादी असे निर्धारण प्राधिकाऱ्यास सकारण वाटल्यास असे निर्धारण सुरू करता येऊ शकेल त्यासाठी तरतूद करणे ;

(घ) कलम २३ च्या पोट-कलम (५) अन्वये दिलेला एकतर्फी निर्धारण आदेश रद्द करण्याकरिता कलम २३ च्या पोट-कलम (११) मध्ये तरतूद करणे ;

(ङ) कोणत्याही अधिनियमाअन्वये कोणतेही दावे मान्य केल्यामुळे किंवा अमान्य केल्यामुळे पाच वर्षांच्या कालावधीमध्ये या अधिनियमाअन्वये कर दायित्वात फेरबदल करण्यासाठी तरतूद करणे ;

(च) कलम ३० च्या पोट-कलम (२) अन्वये देय असलेल्या व्याजाकरिता गणना करण्याच्या पद्धतीची तरतूद करणे ;

(छ) कर दायित्वाच्या प्रयोजनासाठी कंपन्यांच्या एकत्रीकरणामुळे, विलीनीकरणामुळे किंवा विलगीकरणामुळे व्यवसायाच्या हस्तांतरणाचा दिनांक ठरविण्यासाठी कंपनीला पर्याय देण्याची तरतूद करणे ;

(ज) १ एप्रिल २००५ पासून, शिलाईच्या दोऱ्यामध्ये भरतकामाच्या दोऱ्याचा अंतर्भाव करण्यात येईल, हे स्पष्ट करणे ;

(झ) १ एप्रिल २००५ पासून, सर्व स्वरूपातील मसाले, सर्व प्रकारचे मसाले आणि मसाल्याचे कोणतेही मिश्रण यांचा समावेश अनुसूची ग च्या नोंद ९१ मध्ये करण्यात येईल, हे स्पष्ट करणे ;

(ञ) १ सप्टेंबर २००५ पासून, अनुसूची ग च्या नोंद ५४ अन्वये काढलेल्या अधिसूचनेमध्ये पांढऱ्या लोण्याचा समावेश करणे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २६ मार्च २०१५.

सुधीर मुनगंटीवार,
वित्त मंत्री.

वित्तीय ज्ञापन

विधेयकात महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५, महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

हे विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर राज्याच्या आकस्मिकता निधीमधून आवर्ती किंवा अनावर्ती खर्च अंतर्भूत असेल अशी, या विधेयकात कोणतीही तरतूद नाही.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१५ विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

सन २०१५ चे वि.स. विधेयक क्रमांक १६.—महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१५ याचे परिशिष्ट.

(महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ यातील उतारे)

(सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९)

१. ते १२. * * * *

१२अ. ते १२अअ. * * * *

१२ब. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही कारखान्याने किंवा युनिटाने, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा कालावधीसाठी किंवा कालावधींसाठी दिलेल्या किंवा देय असलेल्या करामध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये, भूतलक्षी किंवा भविष्यलक्षी प्रभावाने, पुढीलप्रमाणे सूट किंवा माफी देता येईल :— करातून सूट किंवा माफी देणे.

(अ) ते (ड)

(ई) सन २०१३-२०१४ या वर्षात, शेतकऱ्यांना वाजवी आणि किफायतशीर मूल्य देण्याकरिता राज्यातील साखर कारखान्यांना सहाय्य करण्याच्या प्रयोजनासाठी.

स्पष्टीकरण. * * * *

१३. ते २०. * * * *

(महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यातील उतारे)

(सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६)

१. ते ३०. * * * * *

अनुसूची एक

(कलम ३ पहा)

व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कराच्या दरांची अनुसूची

अनुक्रमांक (१)	व्यक्तींचा वर्ग (२)	कराचा दर (३)
		रुपये
१	वेतनदार व मजुरी मिळणारे — ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी :–	
	(अ) * * * *	
	(ब) ७,५०० रुपयांहून अधिक परंतु, १०,००० रुपयांहून अधिक नाही ;	दरमहा रुपये १७५.
	(क) * * * *	

२. ते २१. * * * * *

टीप. १ व टीप. २ * * * *

अनुसूची दोन * * * *

(महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यातील उतारे)

(सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९)

१. * * * * *

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) ते (१९) * * * *

(२०) "खरेदी किंमत" याचा अर्थ मालाच्या वाहतुकीसाठी उतरवलेल्या विम्याचा खर्च किंवा उभारण्याचा खर्च जेव्हा वेगळा आकारण्यात येत असेल तेव्हा अशा खर्चाव्यतिरिक्त, तो माल स्वाधीन करताना किंवा त्यापूर्वी, त्या मालाच्या संबंधात विक्रेत्याने केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल जी कोणतीही रक्कम आकारण्यात आली असेल ती रक्कम धरून, मालाच्या केलेल्या कोणत्याही खरेदीबद्दल एखाद्या व्यक्तीने दिलेली किंवा तिच्याकडून देय असलेली मौल्यवान मोबदल्याची रक्कम, असा आहे.

स्पष्टीकरण एक.—केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियम, १९४४ किंवा सीमा शुल्क अधिनियम, १९६२ किंवा मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ या अन्वये मालावर आकारण्यात आलेली किंवा आकारणीयोग्य असलेली शुल्काची रक्कम ही अशा मालाच्या खरेदीचा एक भाग असल्याचे मानण्यात येईल—मग अशी शुल्काची रक्कम विक्रेत्याकडून किंवा खरेदीदाराकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून अथवा त्यांच्यावतीने भरलेली असो किंवा देय असो.

स्पष्टीकरण दोन.— * * * *

स्पष्टीकरण तीन.— * * * *

(२१) ते (२४) * * * *

(२५) "विक्री किंमत" याचा अर्थ मालाच्या वाहतुकीसाठी उतरवलेल्या विम्याचा खर्च किंवा मांडणी खर्च जेव्हा वेगळा आकारण्यात येत असेल तेव्हा अशा खर्चाव्यतिरिक्त, तो माल स्वाधीन करण्याच्या वेळी किंवा त्यापूर्वी, त्या मालाच्या संबंधात विक्रेत्याने केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल जी कोणतीही रक्कम आकारण्यात आली असेल ती रक्कम धरून, मालाच्या केलेल्या कोणत्याही विक्रीबद्दल व्यापाऱ्यास दिलेली किंवा देय असलेली मौल्यवान मोबदल्याची रक्कम, असा आहे.

स्पष्टीकरण एक.—केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियम, १९४४, किंवा सीमा शुल्क अधिनियम, १९६२ किंवा मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ यांन्वये मालावर आकारण्यात आलेली किंवा आकारणीयोग्य असलेली शुल्काची रक्कम ही अशा मालाच्या विक्रीच्या किंमतीचा एक भाग असल्याचे मानण्यात येईल— मग अशी शुल्काची रक्कम विक्रेत्याने किंवा खरेदीदाराने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने अथवा त्यांच्यावतीने भरलेली असो किंवा त्यांच्याकडून देय असो.

स्पष्टीकरण दोन.— * * * *

स्पष्टीकरण तीन.— * * * *

(२५) ते (३५) * * * *

३. ते १९. * * * *

विवरणे व स्वयंनिर्धारण. २०. (१) ते (३) * * * *

(४) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने, विवरण सादर केल्यानंतर,—

(क) त्यात कोणताही मजकूर वगळल्याचे किंवा चुकीचे विधान केले असल्याचे त्यास आढळून आले तर, उक्त विवरणात अंतर्भूत असलेल्या कालावधीच्या संबंधातील निर्धारणाची नोटीस त्याच्यावर बजावण्यात योण्यापूर्वी किंवा ज्या वर्षात उक्त विवरण सादर केले असेल त्या वर्षाच्या समाप्तीपासून दहा

महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी, यांपैकी जे अगोदर घडेल, या कोणत्याही वेळी त्यास विवरण सादर करता येईल. ;

(ख) कलम ६१ च्या प्रयोजनार्थ करण्यात आलेल्या लेख्याच्या लेखापरीक्षा अहवालाचा परिणाम म्हणून, विवरण सादर केल्यानंतर त्यात कोणताही मजकूर वगळल्याचे किंवा चुकीचे विधान केले असल्याचे, त्यास आढळून आले तर, उक्त अहवाल सादर करण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी संपण्यापूर्वी जी कोणताही मजकूर वगळण्यात आला असेल किंवा ज्या मजकुराच्या बाबतीत चुकीचे विधान करण्यात आले असेल त्यासंबंधात त्याला त्या वर्षाकरिता एक सुधारित विवरण सादर करता येईल ;

(ग) त्याने दाखल केलेले विवरण, नवीन विवरण किंवा, यथास्थिति, सुधारित विवरण यांमधील कोणताही मजकूर वगळण्यात आला असल्याबाबत किंवा त्यात चुकीचे विधान केले असल्याबाबत कलम ६३ अन्वये त्याला मिळालेल्या कोणत्याही सूचनेमध्ये अंतर्भूत असलेल्या बाबी त्याला मान्य असतील तर, त्याला सूचना देण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, त्या वर्षाकरिता एक सुधारित विवरण सादर करता येईल :

" परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यापाऱ्यास, उपरोक्त प्रत्येक खंडा अन्वये, एकापेक्षा अधिक नाही इतकी सुधारित विवरणे सादर करता येतील आणि अशा सुधारित विवरणामध्ये, यापूर्वी भरलेल्या विवरणाची सुधारणा किंवा सुधारित विवरण यांचा अंतर्भाव करता येईल. "

(५) * * * * *

(६) एखाद्या व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने, या कलमान्वये तरतूद केल्याप्रमाणे, विहित केलेल्या मुदतीत कोणतेही विवरण दाखल करण्यात कसूर केली असेल त्याबाबतीत, उक्त व्यक्ती किंवा व्यापारी उक्त विवरण दाखल करण्यापूर्वी, विलंब शुक्लाच्या रुपाने, असे विवरण दाखल करण्यासाठी विहित केलेला दिनांक समाप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत जर विवरण दाखल केले असेल तर दोन हजार रुपये आणि, इतर कोणत्याही प्रकरणात पाच हचार रुपये इतकी रक्कम प्रदान करील. ही रक्कम विवरणानुसार देय असलेल्या इतर कोणत्याही रकमेव्यतिरिक्त, कोणतीही असल्यास, असेल.

" परंतु, जर सार्वजनिक हिताकरिता तसे करणे आवश्यक असल्याची परिस्थिती अस्तित्वात असेल तर, राज्य शासनास, वेळोवेळी **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत नमूद करण्यात येईल अशा व्यापाऱ्यांच्या वर्गास किंवा वर्गांना अशा कालावधीकरिता किंवा कालावधींकरिता एकतर भविष्यलक्षी प्रभावाने किंवा भूतलक्षी प्रभावाने, या पोट-कलमान्वये देय असलेले संपूर्ण विलंब शुल्क किंवा त्याचा काही भाग माफ करता येईल. ".

२१. व २२.* * * * *

२३. (१) ते (४) * * * * निर्धारण.

(५) (क) या अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही करीत असताना, विक्रीच्या किंवा खरेदीच्या कोणत्याही व्यवहारात नोंद न करता, चुकीच्या पद्धतीने नोंद करून, कोणत्याही कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत, कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने कर चुकविला असेल किंवा चुकविण्याचा प्रयत्न केला असेल किंवा कर दायित्व योग्यरित्या उघड केले नसेल किंवा वजावट अधिक असल्याचा दावा केला असल्याची विहित अधिकाऱ्याची खात्री झाली असेल अशा प्रकरणात, या कलमाच्या इतर तरतुदींअन्वये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही कलमान्वये काढलेल्या निर्धारणाच्या कोणत्याही नोटीशीमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, अशा प्रकरणांमध्ये विहित प्राधिकरणास, अशा व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला विहित नमुन्यात नोटीस आणि आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर असा व्यापारी किंवा व्यक्ती यांचे, असा व्यवहार किंवा दावा यांच्याबाबतीत निर्धारण सुरू करता येईल.

(ख) व (ग) * * * *

(घ) या पोट-कलमान्वये करावयाचे निर्धारण हे, उक्त कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत, आवश्यक असेल तेथे, विहित प्राधिकाऱ्याच्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार, स्वतंत्रपणे केले जाईल आणि या पोट-कलमाखाली केलेले कोणतेही निर्धारण विचारात न घेता, त्या व्यापाऱ्याचे, या कलमाच्या इतर तरतुदींखाली, उक्त कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत, स्वतंत्रपणे निर्धारण करता येईल :

परंतु, एखाद्या व्यापाऱ्याचे किंवा व्यक्तीचे या पोट-कलमाखाली एकदा निर्धारण केल्यावर, अशा व्यवहाराच्या किंवा दाव्याच्या संबंधात, उक्त कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत, या कलमाच्या इतर तरतुदीअन्वये कराचे निर्धारण करतेवेळी अशा कराच्या परिणामी झालेली उलाढाल किंवा लावण्यात आलेला दावा, शास्ती आणि व्याज, कोणतीही असल्यास, त्यांच्यावर कोणताही कर, अशा व्यापाऱ्यावर किंवा व्यक्तीवर बसवण्यात येणार नाही किंवा त्यांच्याकडून मागण्यात येणार नाही.–

"स्पष्टीकरण.—या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, "विहित प्राधिकारी", "उक्त प्राधिकारी", "असा प्राधिकारी" व "कोणताही प्राधिकारी" याचा अर्थ, आयुक्त, किंवा यथास्थिति, कलम १० अन्वये नियुक्त केलेले प्राधिकारी व आयुक्ताने याबाबतीत ज्यांना आपले अधिकार सोपविले आहेत असे इतर अधिकारी व व्यक्ती, असा असेल.".

(६) ते (१०) * * * *

(११) जेव्हा पोट-कलम (२), (३) किंवा (४) अन्वये व्यापाऱ्याचे निर्धारण करण्यात आले असेल आणि, त्या व्यापाऱ्याने, निर्धारण आदेश काढण्यात आला तेव्हा सुनावणीच्या वेळी त्याला आयुक्तापुढे उपस्थित होणे किंवा हजर राहणे शक्य झाले नाही या कारणावरून ते निर्धारण रद्द करण्याबाबत, निर्धारण आदेशाच्या बजावणीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत विहित नमुन्यात आयुक्ताकडे अर्ज केला असेल त्याबाबतीत, आयुक्त, अर्जदाराचे म्हणणे बरोबर आहे आणि विहित शर्ती पूर्ण करण्यात आल्या आहेत याबाबत पडताळणी केल्यानंतर, उक्त निर्धारण आणि त्या निर्धारणाच्या संबंधात वा त्याच्या परिणामी बसविण्यात आलेली कोणतीही शास्ती अथवा व्याज ज्या महिन्यात असा अर्ज केला असेल तो महिना संपल्यापासून तीन महिन्यांच्या आत लेखी आदेशाद्वारे रद्द करील आणि पोट-कलमे (२), (३) किंवा (४) च्या तरतुदीनुसार नवीन निर्धारण करील, तसेच यथास्थिति, व्याज किंवा शास्ती बसवील :

परंतु, या पोट-कलमान्वये कोणत्याही निर्धारण कालावधीच्या संबंधात निर्धारण रद्द करण्याबाबतचा केवळ एकच अर्ज विचारार्थ स्वीकारण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, जर कोणताही आदेश उपरोक्त तीन महिन्यांच्या कालावधीत काढण्यात आला नसेल तर, असा निर्धारण आदेश रद्द करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(१२) पोट-कलमे (२), (३) किंवा (४) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, पोट-कलम (११) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, नवीन निर्धारण आदेश, निर्धारण रद्द करण्याबाबतचा आदेश बजावल्याच्या दिनांकापासून किंवा, यथास्थिति, पोट-कलम (११) च्या दुसऱ्या परंतुकाअन्वये, ज्या दिनांकास निर्धारण आदेश रद्द करण्यात आला असल्याचे मानले असेल त्या दिनांकापासून अठरा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी काढता येईल.

(१३) * * * *

२४. ते २७. * * * *

उलाढालीचे वर्गीकरण.

२८. कोणतेही न्यायालय किंवा न्यायाधिकरण किंवा दुसरे कोणतेही न्यायाधिकरण या अधिनियमाखाली किंवा इतर कोणत्याही अधिनियमाखाली निर्धारित करण्यात आलेला कोणताही कर हा, तो ज्या कायद्याखाली

निर्धारित करण्यात आला त्याहून अन्य कायद्याच्या तरतुदीखाली निर्धारित करावयास हवा होता अशा आशयाचे अपील किंवा पुनर्विलोकन आदेश संमत करील अशा बाबतीत, अशा निर्धारणाच्या कालावधीला मुदतमर्यादेची कोणतीही तरतूद लागू होत असली तरी अशा आदेशाच्या परिणामी, अशा उलाढालीचे किंवा तिच्या भागाचे, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत कोणत्याही वेळी, कर निर्धारण करता येईल आणि कोणतेही निर्धारण हे अगोदरचे केलेले असेल अशा बाबतीत, त्या व्यापाऱ्याला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्या निर्धारणात फेरबदल करण्यात येतील.

२९. * * * * *

३०. (१) * * * * * व्यापारी किंवा व्यक्तींकडून देय असलेले व्याज.

(२) या अधिनियमान्वये किंवा अधिनियमाद्वारे विनिर्दिष्ट मुदतीत एखाद्या नोंदणीकृत व्यापाऱ्याने कर भरण्यास कसूर केली असल्यास त्याला कराच्या रकमेबरोबरच ज्या शेवटच्या दिनांकापर्यंत त्याने कर भरणे आवश्यक असेल त्या दिनांकानंतरच्या प्रत्येक महिन्याकरिता किंवा त्याच्या भागाकरिता या कराच्या रकमेवरील विहित दराने परिगणित केलेली रक्कम सरळ व्याजाने भरावी लागेल :

परंतु, विवरणानुसार, नवीन विवरणानुसार किंवा, यथास्थिती नवीन विवरणानुसार किंवा सुधारित विवरणानुसार देय असलेल्या कराच्या संबंधात या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त व्यापाऱ्याने, असे विवरण सादर करण्यासाठी विहित केलेल्या शेवटच्या दिनांकास त्यापूर्वी अशा कराची संपूर्ण रक्कम भरली नसेल तर, या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये आवश्यकता असल्याप्रमाणे त्याने ज्या कालावधीत अशी कराची रक्कम भरणे, आवश्यक असेल, तेवढ्या कालावधीत ती भरलेली नाही, असे मानण्यात येईल आणि तद्नुसार, त्याने जर अशा दिनांकापर्यंत त्या कराची संपूर्ण रक्कम भरलेली नसेल किंवा फक्त तिचा काही भागच भरलेला असेल तर, अशा दिनांकापर्यंत भरण्यात न आलेल्या अशा कराच्या संपूर्ण रकमेवर किंवा तिच्या भागावर अशा दिनांकानंतर, व्याज भरण्यास तो या खंडान्वये पात्र ठरेल आणि जेथे व्यापाऱ्याने नवीन विवरण किंवा सुधारित विवरण दिले असेल आणि नवीन विवरणानुसार किंवा सुधारित विवरणानुसार देय असलेल्या कराची रक्कम ही, मूळ विवरणानुसार देय असलेल्या कराच्या रकमेहून अधिक असेल तेथे, या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी व्यापाऱ्याने, त्याला मूळ विवरणपत्रानुसार ज्यावेळी कर भरणे आवश्यक असेल त्यावेळी कराची जादा रक्कम भरण्याचे आवश्यक असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार तो, या पोट-कलमान्वये कराच्या उक्त जादा रकमेवर व्याज देण्यास पात्र असेल.

(३) व (४) * * * *

३१. ते **४६.** * * * *

४७. (१) दोन किंवा त्याहून अधिक कंपन्यांचे न्यायालयाच्या किंवा केंद्र सरकारच्या नियत दिनांकाच्या नंतर संमत केलेल्या आदेशानुसार एकत्रीकरण करावयाचे असेल आणि आदेशाच्या दिनांकाच्या अगोदरच्या दिनांकास तो आदेश अंमलात यावयाचा असेल आणि अशा कोणत्याही दोन किंवा अधिक कंपन्यांनी आदेश अंमलात येण्याच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि आदेशाच्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीत, एकमेकांना कोणताही माल विकला असेल किंवा एकमेकांकडून तो खरेदी केला असेल तर, अशा विक्रीचे आणि खरेदीचे व्यवहार, संबंधित कंपन्यांच्या विक्री किंवा खरेदीच्या उलाढालीमध्ये समाविष्ट केले जातील आणि त्यानुसार त्यांच्यावरील कराचे निर्धारण करण्यात येईल. कंपन्यांचे एकत्रीकरण किंवा विलगीकरण.

(२) उक्त आदेशात काहीही अंतर्भूत असेल तरी, या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी उक्त दोन किंवा अधिक कंपन्या, उक्त आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या सर्व कालावधींसाठी वेगवेगळ्या कंपन्या असल्याचे समजण्यात येईल आणि उक्त आदेश आणि उक्त कंपन्यांची नोंदणी प्रमाणपत्रे, आवश्यक तेथे, उक्त आदेशाच्या दिनांकापासून रद्द केली जातील.

(२क) (क) न्यायालयाच्या किंवा केंद्र सरकारच्या नियत दिनांकाच्या नंतर संमत केलेल्या आदेशानुसार जेव्हा एखाद्या कंपनीचे विलगीकरण करण्यात यावयाचे असेल आणि ज्या दिनांकाला तो आदेश काढण्यात आला असेल त्या दिनांकाच्या अगोदरच्या दिनांकास तो अंमलात यावयाचा असेल तर, उक्त आदेशामुळे ज्या दोन किंवा अधिक कंपन्या अस्तित्त्वात आल्या, त्यांनी तो आदेश अंमलात येण्याच्या दिनांकापासून ते त्या आदेशाच्या दिनांकापर्यंत, या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनासाठी परस्परांना कोणत्याही मालाची विक्री केलेली नाही किंवा परस्परांकडून कोणत्याही मालाची खरेदी केलेली नाही असे गृहीत धरण्यात येईल.

(ख) उक्त आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी उक्त दोन किंवा अधिक कंपन्या या उक्त आदेशाच्या दिनांकापर्यंत सर्व कालावधीसाठी एकच कंपनी असल्याचे समजण्यात येईल आणि विलगीकरण करण्यात यावयाच्या कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र उक्त आदेशाच्या दिनांकापासून रद्द करण्यात येईल आणि उक्त दोन किंवा अधिक कंपन्यांना नियमांच्या अधीन राहून, उक्त आदेशाच्या दिनांकापासून नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येतील.

(३) * * * *

४८. ते ९८. * * * *

अनुसूची क. * * * *

अनुसूची ख. * * * *

अनुसूची 'ग'

[कलमे २ (२६), ५ व ६ पहा]

कराचा दर ४% किंवा ५% असलेल्या मालांची सूची

टीप.– "टक्के" या शब्दाचा कराच्या दरासंदर्भातील अर्थ असा की, नोंद ज्या मालासंबंधातील असेल त्या मालावरील कर विक्री किंमतीच्या आधारे लावला जाईल आणि तो, संबंधित मालासमोर दर्शविण्यात आलेल्या विक्री किंमतीच्या टक्केवारी इतका असेल.

अनुक्रमांक (१)	वस्तुचे नाव (२)	कराचा दर (३)
१. ते ३.	* * * *	
४.	सूती व रेशमी सूताची लड व शिलाईचा दोरा यांव्यतिरिक्त सर्व प्रकारचे सूत-मग कोणत्याही साहित्याने वेष्टित असो वा नसो ; त्यापैकी कशाचाही टाकाऊ माल.	५ टक्के
५. ते १०.	* * * *	
११.	(क) सर्व प्रकारचे व सर्व स्वरूपातील मसाले, तसेच जिरे, हिंग, ॲनीसीड, केशर, मिरी, आणि पॉपी सीड्स.	४ टक्के
	(ख) १ एप्रिल २००६ पासून किंवा त्या नंतर सुरू होणाऱ्या कालावधीसाठी-मिरची, हळद, चिंच, धने, मेथ्या आणि पार्स्ले (सुवा)-मग ते आखबे असोत की भुकटी स्वरूपात	४ टक्के
१२. ते ११५.	* * * *	
अनुसूची घ	* * * *	
अनुसूची ड	* * * *	

अधिसूचना

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.

क्रमांक मूवक. १५०५/प्र.क्र. २३४/कराधान-१.—महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) यास जोडलेल्या अनुसूची "ग" मधील नोंद ५४ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, दिनांक १ सप्टेंबर २००५ पासून वित्त विभाग अधिसूचना क्र. मूवक १५०५/प्र.क्र. ११५/कराधान, दिनांक १ एप्रिल २००५ रद्द करून यास जोडलेल्या अनुसूचीमध्ये अधिक सविस्तर वर्णन दिलेल्या पुढील वस्तु, मग त्या जेनेरिक नावाने किंवा कोणत्याही अन्य नावाने विकल्या जात असोत वा नसोत, औद्योगिक निविष्टीच्या वस्तू आणि आवेष्टन सामग्री म्हणून विनिर्दिष्ट करीत आहे, जसे :—

अनुसूची

केंद्रीय उत्पादन प्रशुल्क अधिनियम, १९८५ (१९८६ चा ५) याच्याखाली नमूद केलेल्या यथास्थिती शीर्षाखाली किंवा उप शीर्षाखाली किंवा यथास्थिती उत्पादनशुल्क बाबीखाली वेळोवेळी समाविष्ट करण्यात आलेल्या औद्योगिक निविष्टीच्या वस्तू आणि आवेष्टन साम्रग्री :—

अ.क्र. (१)	शीर्ष क्रमांक (२)	उप शीर्षक्रमांक (३)	टॅरीफ आयटम क्रमांक (४)	मालाचा तपशील (५)
१	*	*	*	*
२	..	...	०४०५ १० ००	देशी लोणी
३ ते २५०.	*	*	*	*
टिप. १ ते ४	*	*	*	*

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६.)

[महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक
कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]

[श्री. सुधीर मुनगंटीवार,
वित्त मंत्री.]

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई